**SET-4**

**Series SGN**

**कोड नं.**
**Code No. 9**

रोल नं.
Roll No.

|  |  |  |  |  |  |  |
|---|---|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |  |  |

परीक्षार्थींनी उत्तर-पुस्तिकेच्या मुखपृष्ठावर कोड नं. अवश्य लिहावा.

Candidates must write the Code on the title page of the answer-book.

- प्रश्न-पत्रिकेत **5** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर-पुस्तिकेच्या मुखपृष्ठावर लिहा.
- प्रश्न-पत्रिकेत **8** प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.
- Please check that this question paper contains **5** printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **8** questions.
- **Please write down the Serial Number of the question before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : 3 तास* | *गुण : 100*

*निर्धारित समय : 3 घण्टे* | *अधिकतम अंक : 100*

*Time allowed : 3 hours* | *Maximum Marks : 100*

## SECTION A (Comprehension)

**1.** खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा :

'सामाजिक कविता' हा अनेक कविताप्रकारांपैकी एक कविताप्रकार आहे. कवितेतील विषय आणि आशय लक्षात घेऊन तो मानला जातो. अर्थात अभ्यासाच्या सोयीमधूनच हा आणि अशा प्रकारचे इतर कविताप्रकारही कल्पिले गेले आहेत. सामाजिक कविता म्हणजे केंद्रस्थानी समाजजाणीव असलेली कविता होय. कोणत्याही एका समूहजाणीवेला, समूहाच्या व्यथेला, दुःखाला आपल्या अभिव्यक्तीमध्ये केंद्र करणाऱ्या कवितेला सामाजिक कविता म्हणता येईल. सामाजिक कविता म्हणजे समाजविषयक असलेली कविता होय. सामाजिक कवितेमध्ये समाजाची सुख-दुःखे, व्यथा-वेदना, प्रश्न-समस्या, घडामोडी-चळवळी-आंदोलने यांना महत्त्वाचे स्थान असते. ह्या सर्व गोष्टी सामाजिक कवितेतून कधी वर्णनाच्या, कधी निवेदनाच्या, कधी चित्रणाच्या, तर कधी चिंतनाच्या पातळीवरून व्यक्त होत असतात. त्या व्यक्त करणारा कवी हा कसा आहे, त्यावर ह्या सर्व गोष्टींचे स्वरूप, दर्जा, मूल्य, महत्त्व हे अवलंबून असते. ह्यातूनच कवी आणि समाज असे सामाजिक कवितेचे द्वंद्वात्मक स्वरूप आकारास येत असते. हे द्वंद्वात्मक स्वरूप कधी संघर्षात्मक, कधी समन्वयात्मक, तर कधी सुसंवादात्मक असते. सामाजिक कवितेत जितके कविमनाला महत्त्व असते, तितकेच समाजमनालाही महत्त्व असते. कविमनाला जर समाजमन नीट कळले-समजले, तर कवी आपल्या सामाजिक कवितेत ते यथार्थपणे शब्दबद्ध करू शकणार अन्यथा नाही. एखादा कवी जर सामाजिक कार्यकर्ता असेल, तर त्याला समाजमन जाणून घेण्यास अजून काही वेगळे प्रयत्न करावे लागणार नाहीत.

**प्रश्न :**

(i) सामाजिक कवितेची व्याख्या कशी करता येते ? *2*

(ii) सामाजिक कविता आणि समाज यांच्यामध्ये कोणता संबंध आहे ? *2*

(iii) सामाजिक कवितेतील चित्रणाचा आविष्कार कोणत्या प्रकारे होत असतो ? *2*

(iv) सामाजिक कवितेचे द्वंद्वात्मक स्वरूप कोणत्या प्रकारचे असते ? *2*

(v) सामाजिक कवितेतील कविमन व समाजमन यांच्यामधील संबंध कसा असतो ? *2*

## SECTION B (Writing)

**2.** खालीलपैकी ***एका*** विषयावर 25 ते 30 ओळींत निबंध लिहा : *15*

(i) उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी !

(ii) स्त्रीशक्ती

(iii) वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळले तर ...

## SECTION C (Grammar)

**3.** खालीलपैकी कोणत्याही ***पाच*** विधानांमध्ये कंसातील सूचनेप्रमाणे बदल करा : *15*

(i) इमामांनी सूर्योदया पूर्वी मशिदीतून बांग दिली. (कर्तरी करा)

(ii) दुपारच्या वेळी जास्त झोपू नये. (आज्ञार्थी करा)

(iii) निवडणुकीच्या उमेदवारीचा अर्ज भरल्यानंतर नानासाहेब हवेत मनोरे रचू लागले. (वाक्प्रचाराऐवजी त्याच्या अर्थाचे उपयोजन करून वाक्य पुन्हा लिहा)

(iv) विदिशा कादंबरी वाचते. (कर्मणी करा)

(v) काका, स्कूटर चालवताना हेल्मेट वापरा. (विध्यर्थ करा)

(vi) दुर्गेने महिषासुर मारला. (भावे प्रयोग करा)

(vii) मुलगी माहेरी आल्यामुळे शारदाकाकूंचा आनंद गगनात मावेना. (वाक्प्रचाराऐवजी त्याच्या अर्थाचे उपयोजन करून वाक्य पुन्हा लिहा)

**4.** (अ) वचन बदला : *2*

(i) म्हैस

(ii) अरण्य

(ब) क्रियाविशेषणे बनवा : *3*

(i) वेग

(ii) सायंकाळ

(iii) उंच

**5.** कंसातील शब्दांची योग्य रूपे वापरून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही ***पाच***) *5*

(i) संध्याकाळी एकदाच (नळ) पाणी येते.

(ii) त्याच्या बोलण्याने (ती) फार दुःख झाले.

(iii) आंबा पूर्ण पिकल्यावरच त्यात (गोड) निर्माण होते.

(iv) रस्त्यात (बसणे) गाईमुळे रहदारीला अडथळा होत होता.

(v) ते जहाज (तुफान) दिशाहीनपणे भरकटले.

(vi) गर्दीतून गाडी (चालवणे) तिची तारांबळ उडाली.

(vii) अहाहा ! काय हा (सौंदर्य) देखावा !

## SECTION D (Literature)

**6.** (अ) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा : *10*

(i) "काँप्यूटरचे ठरू पाहणारे हे युग माझ्या दृष्टीने कर्जाचे व हप्त्यांचे ठरले होते," असे लेखक का म्हणतात ?

(ii) गुंडगुळयाचा माळ हे ठिकाण भुतांच्या दृष्टीने गैरसोयीचे का होते ?

(iii) बँडच्या आवाजामुळे लेखकाच्या मनात कोणत्या शंका आल्या ?

(ब) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : *10*

(i) "लाखात एखाद्याच्या ललाटी नंदनवनाची प्राप्ती कोरलेली असते."

(ii) "एवढंच काय, त्या भोवऱ्यात फिरता नाही माझ्या आजूबाजूला कित्येक गोळया पाण्यात लागल्या होत्या."

(iii) "ती चिट्ठी वाचून त्यांनी घाईघाईनं आपलं भाषण आवरतं घेतलं."

**7.** (अ) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : *10*

(i) "ऊन – वाऱ्याशी खेयता
एका एका कोंबातून
पर्गटले दोन पानं
जसे हात जोडी सनं"

(ii) "स्त्रीपुरुषें सर्व कष्टकरी व्हावें ।। कुटुंबा पोसावें ।। आनंदाने ।।"

(iii) "ज्योतींत तुझ्या जळल्यावांचुन
मातीला नच मिळेल माती"

(ब) खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** पद्यांशातील अलंकार ओळखा : *5*

(i) "इच्या सौंदर्याची सीमा । झाली गडे रतिहुनी अति उत्तमा ।
पाहुनिया मुखचंद्रमा । सखे गडे अमा गमति पौर्णिमा ।"

(ii) "फुंकिन मी जी स्वप्राणाने
भेदुनि टाकिन सगळी गगने
दीर्घ जिच्या त्या किंकाळीने,
अशी तुतारी द्या मजलागुनि"

(iii) "नभ असे नभापरी । सागर सागरापरी ।
रामरावणांचे युद्ध । रामरावण युद्धापरी ।"

**8.** (अ) आकाशवाणी वरील मुलाखतीचे प्रकार सांगा. *10*

**किंवा**

एच.टी.एम.एल. चे महत्त्व सांगा.

(ब) 'आमची शाळा' या विषयावर तुम्हाला आकाशवाणीवर भाषण करावयाचे आहे, तर त्याची तयारी कशी कराल ? *5*